# आदामाप्रमाणे आम्ही सर्वांनी पाप केले आहे:

### आमच्या पापाने आम्हांला अपराधी, लाजिरवाणे केले आणि आम्हांला बंधनात ठेवले.

### मुलांना शिकवणाऱ्यांनी S4b हा अभ्यास वाचावा.

**प्रार्थना :** ''प्रिय प्रभू येशू, आमच्या पापाच्या परिणामातून आमची सुटका करण्यासाठी तू मरण पावलास. कृपा करुन, आमच्या पापीपणाचा सामना करण्यासाठी आणि पापावर तू मिळवलेल्या विजयात राहण्यासाठी आमचे साहय्य कर. आमेन.''

सध्याच्या गरजा आणि स्थानिक रीतीरिवाज यानुसार कार्यक्रम निवडा.

1. **तुमच्या मंडळीने तिच्या पापीपणाचा निकाल करावा यासाठी तिला मदत करण्याकरीता प्रार्थना व देवाच्या वचनातून स्वतःची तयारी करा.**



पवित्र शास्त्र शिकवते की, प्रत्येकजण पाप घेऊन जन्माला येतो, सर्वजण पापी आहेत आणि आपल्यापैकी प्रत्येकजण पाप करतो (1 योहान 1:8-10).

**पाहा उत्पत्ती 3:1-9** मध्ये पाप कोठून आले.

- सैतानाने आपल्या पहिल्या पूर्वजांना कोणती खोटी गोष्ट सांगितली? *(वचने 4 व 5)*
- देवाने सैतानाला काय शिक्षा दिली? *(वचने 13-15)*
- देवाने आमच्या पूर्वजांना काय शिक्षा दिली? *(वचने 16-19)*

**पाहा स्तोत्र 51:1-5** मध्ये दावीद आपल्या पापाविषयी काय म्हणतो :

- आपली गरज त्याने कशी ओळखली? *(वचने 1 व 2)*
- तो आपल्या पापाविषयी काय म्हणतो? *(वचन 3)*
- त्याने कोणाविरुद्ध पाप केले? *(वचन 4)*
- तो केव्हापासून पातकी झाला? *(वचन 5)*

**पाहा इब्री 12:1-4** मध्ये आमचे पाप किती धोकादायक आहे :

- आम्हा विश्वासणाऱ्यांचा पाप करण्याकडे किती कल असतो? *(वचन 1)*
- आमच्या पापासाठी येशूने वधस्तंभावर काय सहन केले? *(वचन 2)*
- इतरांच्या पापांमुळे आम्हांला काय होऊ शकते? *(वचन 3)*
- काही वेळा आपण पापाच्या मागे का जातो? *(वचन 4)*



**आमच्या पापांचे तीन भयंकर परिणाम होतात:** अपराध, लाज-शरम आणि बंधन :

1) **अपराध :** देवासमोर आम्ही अपराधी आहोत.

- एखाद्या गुन्हेगारासारखी कायद्याच्या न्यायालयात

सुनावणी होऊन न्यायाधीशाने आरोप ठेवले, म्हणून आमच्या पातकांचा हिशेब आम्ही देवाला देणे अगत्याचे आहे.

- सुदैवाने, ख्रिस्ताने आमची पातके स्वत:कडे घेतली आणि आमच्याऐवजी तो वधास्तंभावर मरण पावला. अशा प्रकारे, येशूवर विश्‍वास ठेवणार्‍यांच्या सर्व पातकांची देव क्षमा करतो.

2 ) **लाज-शरम :** देवासमोर आम्ही लज्जित होतो.

- एखादे लाजिरवाणे कृत्य करताना पकडल्या गेलेल्या व्यक्ति प्रमाणे, म्हणूनच शेवटच्या न्यायाच्या वेळी देव आमची सर्व पापे उघड करील त्या वेळी आम्हा मानवप्राण्यांना त्याच्यासमोर लज्जेने पाणी पाणी व्हावे लागेल.
- परंतु-देवाचे उपकार आहेत-आमच्याऐवजी येशू ख्रिस्ताने सर्वांच्या समोर लज्जा सहन केली जेणे करुन तो परत येईल तेव्हा आम्हांला लाजिरवाणे वाटू नये.

3 ) **बंधन :** पापी गोष्टी केल्यामुळे आम्ही बंधनात पडतो.

- एखादा दारुबाज जसे दारु पिणे सोडत नाही आणि त्याच्या ह्या व्यसनामुळे त्याचे कुटुंबच उध्वस्त होते. म्हणजे आपण सर्वजण मद्य, अंमली पदार्थ, जादूटोणा, खोटी दैवत, अनैतिक गोष्टी आणि अनैतिक संबंध ह्यासारख्या पापी गोष्टींच्या आहारी जातो.
- परंतु देवाची स्तुती असो! येशू आमच्यासाठी वधास्तंभावर मरण पावला तेव्हा त्याने सैतानाचे सामर्थ्य नष्ट केले आणि आमच्या बंधानातून आमची सुटका केली.

## 2. आगामी आठवडयातील कार्यक्रमांविषयी तुमच्या सहकार्‍यांशी चर्चा करुन योजना आखा.

तुमच्या मंडळीच्या सदस्यांना क्षमेची आणि सुटका होण्याची गरज असते याची एकत्रित चर्चा करा.

- कोणत्या सदस्यांना त्यांनी केलेल्या पापांची देवाने क्षमा करण्याची गरज आहे? त्यांना जाऊन भेटा, त्यांना त्यांची पापे कबूल करण्यासाठी मदत करा, त्यांना प्रभुभोजन द्या आणि पापक्षमेची ओळख करुन घेण्यासाठी त्यांच्याबरोबर प्रार्थना करा.
- कोणत्या सदस्यांना त्यांच्या पूर्वायुष्याबद्दल अद्याप लाज वाटते? त्यांना जाऊन भेटा, त्यांच्यासाठी येशूला कसे लाजिरवाण्या गोष्टींना तोंड द्यावे लागले ते स्पष्ट करुन सांगा आणि त्यांना वाटणार्‍या लज्जेतून त्यांनी बाहेर यावे यासाठी प्रार्थना करा.
- कोणत्या सदस्यांची व्यसनांपासून सुटका होण्याची आवश्यकता आहे? त्यांना जाऊन भेटा, त्यांना त्यांच्या वाईट सवयी सोडून देण्यास मदत करा. तुमचे त्यांच्यावर लक्ष असल्याची त्यांना खात्री द्या आणि त्यांच्या सुटकेसाठी प्रार्थना करा.

ह्या सर्व सदस्यांना **1 योहान 2:28** हे वचन पाठ करायला सांगा.

## 3. आगामी उपासना सभेविषयी तुमच्या सहकार्‍यांशी चर्चा योजना आखा.

उत्पत्ती अध्याय 3 मधून आदाम व हव्वा आणि त्यांचे पतन हा कथावृत्तांत सांगा किंवा नाट्यीकरण करा. वर भाग 1 मध्ये दिलेले प्रश्नच विचारा.

दावीद आपल्या पापाविषयी काय सांगतो हे स्पष्ट करुन याविषयी भाग 1 मध्ये दिलेले प्रश्न विचारा.

भाग 1 मध्ये नमूद केलेल्या रोम 3:19-23,1 योहाना 5:16-19 आणि इब्री 12:1-4 ह्या शास्त्रभागातून थोडक्यात सत्य स्पष्ट करुन सांगा आणि तेच प्रश्न विचारा.

वाईट व्यसनांपासून किंवा भुतांपासून नुकतीच सुटका झालेल्या विश्‍वासणार्‍यांना **साक्ष देण्यास सांगा.**

**मुलांना** त्यांनी तयारी केलेली नाटिका व प्रश्न सादर करण्यास सांगा.

**प्रे.कृ.** 19:11-20 हा शास्त्रभाग वाचा किंवा नाट्यीकरण करा. लोकांनी त्यांची पापे कशी कबूल करा. अशा प्रकारे त्यांना पापक्षमा करण्यात आली, ते लज्जेतून बाहेर आले आणि दुष्ट आत्म्यांच्या बंधनातून त्यांची सुटका झाली.

**प्रभुच्या मेजाची** ओळख करुन देण्यासाठी उत्पत्ती 3:6-10 व 21 वाचा. आदाम व हव्वा ह्यांनी अंजिराच्या झाडाच्या पानांनी आपली लाज झाकली हे स्पष्ट करुन सांगा. परंतु देवाने त्यांना प्राण्यांच्या कातडीचे कपडे घातले कारण निर्दोष बळीच्या रक्तामागे आमची पातके देवाच्या दृष्टीआड असणे आवश्यक होते, येशू हा देवाचा कोकरा आमची सर्व पापे आपल्यावर घेणार असल्याचे ह्या प्राण्याच्या अर्पणांतून सूचित केले.

दोन वा तीनजणांचे लहान गट करा. त्यांनी आपली पातके कबूल करून एकमेकांची क्षमा व स्वातंत्र्य यासाठी प्रार्थना करापी.

**पाठ करा यशया 1:18**

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net